# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

**1. District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** आनसिंग **Year (वर्ष):** 2019

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0081 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/04/2019 08:41 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | प्रिवेन्शन ओफ करपशन एक्ट, 1988 | 7 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार **Date From (दिनांक पासून):** 02/01/2019
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/01/2019
**Time From (वेळेपासून):** 15:32 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:55 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 25/04/2019 **Time (वेळ):** 08:27 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद** 007 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/04/2019 08:27 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**5. Place of Occurrence (घटनास्तळ):**

1.**(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** दक्षिण, 1 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** अनसिंग टाऊन ,वाशीम

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नांव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** परशराम सखाराम मारकड

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव)**

**(c) Date/Year of Birth (जन्म** 1976 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची तारीख):**
**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned by CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ढिल्ली,वाशीम ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ढिल्ली,वाशीम ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | गिरजाराव घोडबाराव मस्के | | | 1. जयपुर,वाशीम ,आनसिंग,वाशिम, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्यादिला.प्र.वि.,वाशीम.कम्प अनसिंगदिनांक:- 24.04.2019मी अमोल पंजाबराव इंगोले वय - 37 वर्ष व्यवसाय - नोकरी पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशीम. सरकार तर्फे फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशीम येथे पोलीस निरीक्षक या पदावर दि.08.05.2018 पासुन कार्यरत आहे. दि.02.01.2019 रोजी मी वाशीम येथे हजर असतांना तक्रारदार परसराम सखाराम मार्कड वय-43 वर्ष, व्यवसाय शेती, रा.ढिल्ली पो.जयपुर ता.जि.वाषिम यांनी फोनव्दारे संपर्क करून त्यांची लाच मागणी बाबत तक्रार असल्याचे कळविले व थोडक्यात तक्रार सांगितली. तक्रारदार यांना विश्राम गृह वाशीम येथे येण्यास सांगितले. प्राप्त तक्रारीवरुन कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, वाशीम यांना दोन कर्मचारी पंच म्हणुन मिळणेकरीता गोपनिय पत्र देवुन दि.02.01.2019 रोजी दोन पंच कर्मचारी उपलब्ध करुन घेतले. दि.02.01.2019 रोजी तक्रारदार यांनी विश्राम गृह वाशीम येथे समक्ष तक्रार दिली की, तक्रारदार हे शेती करतात. त्यांचेकडे शेती कामासाठी महिंद्रा कंपनीचा ट्रक्टर असुन कधी काम मिळाले तर ते गिट्टीची वाहतुक करतात. ट्रक्टर नविन घेतला असल्याने आतापर्यंत पासींग झाली नाही. यापुर्वी तक्रारदाराकडे जुना ट्रक्टर होता. तसेच तक्रारदाराकडे जुनी ट्रॉली असून त्याचा क्रमांक एम एच 37.ए9030 असा आहे. दिनांक 25/12/2018 रोजी तक्रारदार त्यांचा ट्रक्टर मध्ये एक ब्रास गिट्टी सावळी घोटा येथून भरून ढिल्ली गावातच मंजुबाई गायकवाड यांचे घरी टाकण्यासाठी घेवुन जात होते. संध्याकाळी 06/00 वा. चे वेळी पोलीस जमादार पत्रे यांनी त्यांचा ट्रक्टर गावाजवळ पकडला. त्यावेळी त्यांचे सोबत आणखी दोन पोलीस होते. त्यावेळी जमादार पत्रे यांनी तक्रारदाराचे जवळ येयून म्हटले की, तुमच्याकडे गिट्टीची रॉयल्टी आहे काय तसेच तुमच्या ट्रक्टरला नंबर नाही. तुम्ही कोणाच्या परवानगीने ट्रक्टर चालवता. तुम्हाला ट्रक्टर चालु ठेवायचे असेल तर 30,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणुन 30,000/-रूपये ची मागणी केली व सदरचे पैसे गिरजाराव मस्के यांचेकडे देण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदाराजवळ रॉयल्टी नव्हती. पाठी मागुन तक्रारदाराचा भाऊ विलास मार्कड हा रॉयल्टी ची पावती घेउन आला. त्यानंतर जयपुर येथील गिरजाराव मस्के यांना जमादार पत्रे यांनी बोलावुन घेतले व त्यांच्या मार्फत तडजोडीअंती रूपये 15,000/-रूपये चे मागणी जमादार पत्रे यांनी केली आहे. तुमचे ट्रक्टर चालु ठेवायचे असेल व कारवाई करायची नसेल तर मला नियमीत हप्ता दयावा लागेल. पैसे दिले नाहीतर तुमचे ट्रक्टर चालु देणार नाही अशी धमकी दिली व लाचेची मागणी केली. गिरजाराव मस्के हा पोलीसांना इतर ट्रक्टरवाल्याकडून हप्ते जमा करण्याचे व तोडीपाणी करून दयायचे काम करतो. तक्रारदारांना ट्रक्टर चालवयाचे असल्यामुळे त्यांनी नाईलाजाने पैसे देण्याचे कबुल केले आहे. त्यावेळी त्यांनी ट्रक्टर सोडून दिला होता.पोलीस जमादार पत्रे व गिरजाराव मस्के यांच्यावर लाच मागणीची कारवाई करण्यात यावी ही विनंती, अशी तक्रार दिली. तक्रारदार यांनी त्यांना व्यवस्थीत लिहिता येत नसल्याचे सांगितल्याने तक्रारदार यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांची तक्रार पंच विलास सोनुने यांचेकडून लिहून घेण्यात आली. दोन्ही पंचांनी तक्रारीवर सहया केल्या. त्यानंतर पुढील कार्यवाही करीता 14.45 वा. वाशीम वरून कार्यवाही करीता लागणा-या साहित्यासह दोन खाजगी मोटर सायकलने आम्ही, पो.नि.बो-हाडे, दोन्ही पंच व पो.ना.अरविंद राठोड तसेच तक्रारदार हे



Scanned by CamScanner

त्यांचे मोटर सायकलने रवाना होवुन 15.15 वा. पिंपळगाव चे अलीकडे मोबाईल टॉवर जवळ पोहचून एका शेतात थांबलो. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1, यांना पडताळणी कार्यवाही संबंधी आवशक त्या सुचना देवून गै.अ.गिरजाराव मस्के व जमादार पत्रे यांची भेट घेणेकरीता 15.32 वा. सुमारास अनसिंग येथे रवाना करून पडताळणी केली असता पडताळणी दरम्यान, तक्रारदार यांनी गै.अ.गिरजाराव मस्के यांना, आता किती दयायचे म्हणायले मंग, असे विचारले असता गै.अ.गिरजाराव मस्के यांनी जमादार पत्रे यांना उद्देशुन, ते पंधरा हजार रूपये म्हणा लागला दयायचं.... पंधरा हजार रूपये, असे सांगितले. तसेच तक्रारदार यांनी, बोललो असतो अपन जावुन काही कमी जास्त, असे म्हटले असता, गै. अ.गिरजाराव मस्के यांनी, ते बोलत नाही म्हणे तुमच्यासंग कोणासोबत..... तुम्ही हवाला घेतला तुम्ही दया म्हणे, असे सांगितले. तसेच गिरजाराव मस्के व तक्रारदार यांचेमध्ये झालेल्या संभाषना दरम्यान गिरजाराव मस्के यांनी, पैसे दया न तुम्ही..... फक्त तुय तुल पैसे बुआ दोन दिवसात का तिन दिवसात देवुन टाकते बुआ इतकच ठरल आपलं.... अहो तुमचा देखत पंधरा ठरले होते का नाही..... तुम्ही दहा हजार घेवुन या आपण दहा हजारात मिटवुन टाकु आ....दहा हजार दया ना,..... ऐका तर तुम्ही काय म्हणाले एक ना दोन दिवसात पैसे देतो दोन दिवसात झालेला वा चार पाच दिवस झाले सात आठ दिवस झाले, असे तक्रारदारास म्हटले. एकंदरीत जमादार पत्रे यांनी दिनांक 25/12/2018 रोजी तक्रारदार यांचा गिट्टीचा पकडलेला ट्रक्टर सोडून दिला त्याचा मोबदला तसेच गिट्टी मुरूमवर ट्रक्टर चालु देण्याकरीता गै.अ.गिरजाराव मस्के (खाजगी ईसम) यांनी, जमादार पत्रे यांचेकरीता प्रथम 15,000/-रूपये व तडजोडीनंर 10,000/-रूपये लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झाले. गैरअर्जदार जमादार पत्रे हे बाहेरगावी गेल्याने तक्रारदाराची त्यांचेसोबत भेट झाली नाही. गै.अ.गिरजाराव मस्के यांनी गै.अ.पत्रे करीता लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. तक्रारदार यांनी गै.अ.जमादार पत्रे यांचेसोबत भेटी बाबत कळविल्यानंतर जमादार पत्रे यांची पडताळणी कार्यवाही करण्याचे ठरले. त्या संबंधाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा पडताळणी पंचनामा 23.30 वा. पुर्ण करण्यात आला.दिनांक 04.01.2019 रोजी तक्रारदार यांनी गै.अ.जमादार पत्रे यांचेसोबत आज रोजी पोलीस स्टेशन अनसिंग येथे भेट होईल, असे फोनव्दारे कळविल्याने पंच कर्मचारी व तक्रारदार यांना विश्राम गृह वाशीम येथे हजर येणेबाबत कळविले असता पंच कर्मचारी तसेच तक्रारदार व त्यांचा भाउ विलास मार्कड हे हजर आले. त्यानंतर पुढील कार्यवाही करीता 12.30 वा. वाशीम वरून कार्यवाही करीता लागणा-या साहित्यसह दोन खाजगी मोटर सायकलने आम्ही, पो.नि.बो-हाडे, दोन्ही पंच व पो.ना.अरविंद राठोड तसेच तक्रारदार व त्यांचा भाउ विलास मार्कड हे त्यांचे मोटर सायकलने रवाना होवुन 13.00 वा. पिंपळगाव अलीकडे मोबाईल टॉवर जवळ पोहचून एका शेतात थांबलो. त्यानंतर तक्रारदार, विलास मार्कड व पंच क्र.1, यांना पडताळणी कार्यवाही संबंधी आवशक त्या सुचना देवून गै.अ.जमादार पत्रे यांची भेट घेणेकरीता अनसिंग येथे रवाना केले असता गै.अ.जमादार पत्रे हे हजर नसल्याने तक्रारदार यांची गै.अ.जमादार पत्रे यांचेसोबत भेट झाली नाही. त्या संबंधाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा पडताळणी पंचनामा 16.30 वा. पुर्ण करण्यात आला.त्यानंतर दि.07.01.2019 व दि.08.01.2019 रोजी तक्रारदार यांना पुढील कार्यवाही करीता येणेबाबत फोनव्दारे कळविले परंतु तक्रारदार हे हजर आले नाही. तसेच दि.10.01.2019 रोजी तक्रारदार यांना पुढील कार्यवाही करीता येणेबाबत कळविले असता त्यांना गै.अ.गिरजाराव मस्के हे त्यांचे गावाजवळील लगतचे गावात जयपुर येथे राहणारे असून गिरजाराव मस्के यांचेवर त्यांचे तक्रारीवरून कार्यवाही झाल्यास त्यांचे संबंध खराब होवून नेहमी वाद होत राहतील व गै.अ.जमादार पत्रे हे त्यांचेकडून पैसे स्वीकारणार नाहीत. तसेच तक्रारदाराचा भाउ विलास मार्कड यांची प्रकृती ठिक राहत नाही. ते वारंवार भानगडीत पडू नको व पुढे कार्यवाही करू नको असे सांगत आहे. त्यामुळे त्यांना पुढे कार्यवाही करायची नाही. असे सांगितले. तसा त्यांचा दि.10.01.2019 रोजी जबाब नोंदविण्यात आला. तक्रारदाराने जबाबात वरील प्रमाणे सांगितल्याने मा.वरिष्ठाचे योग्य मार्गदर्शना करीता जा.क्र. ऑकब्यु/वाशिम/तक्रारपडताळणी/अहवाल/72/2019, दि.11.01.2019 प्रमाणे अहवाल पडताळणी करीता सादर केला. त्यावरून मा.पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र अमरावती यांचे आदेश क्र.पोअ/ऑकब्यु/तक्रार पडताळणी/ 955/2019, दि. 10/04/2019 प्रमाणे गै.अ.गिरजाराव मस्के यांचे विरूध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदा (सुधारणा 2018) कलम 7 A अन्वये गुन्हा दाखल करणेबाबत आदेश प्राप्त झाला.एकंदरीत तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारी नुसार व दि.02.01.2019 रोजीचे पडताळणी दरम्यान, जमादार पत्रे यांनी दिनांक 25/12/2018 रोजी तक्रारदार यांचा गिट्टीचा पकडलेला ट्रक्टर सोडून दिला त्याचा मोबदला तसेच गिट्टी मुरूमवर ट्रक्टर चालु देण्याकरीता गै.अ.गिरजाराव मस्के (खाजगी ईसम) यांनी, जमादार पत्रे, लोकसेवक यांचेकरीता तडजोडीअंती 10,000/-रूपये लाचेची मागणी केल्याचे निश्पन्न झालेले आहे. आरोपी गिरजाराव धोंडबाराव मस्के, वय 48 वर्ष- रा. जयपुर ता.जि. वाशीम यांचे हे कृत्य कलम 7A लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988(सुधारीत 2018) अन्वये गुन्हा होत असल्याने त्यांचे विरुध्द माझी कायदेशिर फिर्याद आहे. (ए.पी.इंगोले) पोलीस निरीक्षक लाचलुचप्रतिबंधक विभाग,वशीम. .

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**

**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** BABAN GANGARAM KHARALE(I (Inspector)) / POBN70016 **or**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे** **Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार**



Scanned by CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): BABAN GANGARAM KHARALE
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): POBN70016

Scanned by CamScanner